पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम
कार्यालय दुरध्वनी क. ०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

दि. २५/१०/२०२१

**पो. स्टे., वाशिम शहरची कारवाई इसम नामे महादेव राजाभाउ लोखंडे, रा. काळे फैल, वाशिम यास वाशिम जिल्हयातून ०१ वर्षाकरिता केले हद्दपार**

इसम नामे महादेव राजाभाउ लोखंडे, वय २३ वर्ष, रा. काळे फैल, वाशिम याचे विरूध्द पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे अप क. १२५/२०१७, कलम ४५२, ३५४(ड), ३५४(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भा.द.वि. अन्वये दाखल झाला होता. सदर गुन्हयामध्ये त्याला मा. न्यायालयाने कलम ४५२, ३५४ (अ) (i) (i) भा.द.वि. या कलमान्वये दोषी ठरविण्यात येउन दि. १३/०८/२०१९ रोजी ०२ वर्ष परिविक्षाधीन अधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयाच्या देखरेखीखाली ठेवण्याची व १५,०००/– रू. चा लायक जामीनदार सादर करण्याची व २,०००/– रू. दंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर देखील नमूद इसमाच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाल नाही व त्याच्या विरूध्द पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे अप क. ५१४/१९ कलम ३७९ भा. दं.वि. अन्वये दुसरा गुन्हा दाखल झाला. त्यानंतरही त्याच्या वर्तनात सुधारणा झाली नाही व शहरात त्याची गुंडगिरी व दहशत वाढतच राहिली तसेच भविष्यात देखील सदर इसमाकडून सार्वजनिक शांतता भंग होउन त्याचेपासून सार्वजनिक शांततेस भय, इजा, धोका निर्माण होईल म्हणून त्यास वाशिम व नजीकच्या जिल्हयातून हद्दपार करणे करिता त्याच्या विरूध्द म.पो.का. कलम ५७ (१) अन्वये मा. उपविभागीय दंडाधिकारी, वाशिम यांच्याकडे प्रस्ताव पाठविला असता मा. उपविभागीय दंडाधिकारी, वाशिम यांनी सदर प्रस्तावावरून त्यास दि. २२/१०/२०२१ रोजी वाशिम जिल्हयातून पुढील ०१ वर्षाकरिता हद्दपार केले असून हद्दपार इसम महादेव राजाभाउ लोखंडे यास वर्धा येथे त्याच्या नातेवाईकांकडे नेउन सोडण्यात आले आहे.

सदर इसमास हद्दपार करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह सो., अपर पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे सो., उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. यशवंत केडगे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली व ठाणेदार श्री. धृवास बावनकर यांच्या नेतृत्वाखाली डि.बी. पथकाचे सपोनि खंदारे, पो.ह.क. ३४७/लालमणी श्रीवास्तव, पो.ना.क. ८५६/रामकृष्ण नागरे, पो.शि.क. २१०/मात्रे, पो.शि.क. २४३/विठ्ठल महाले व पो.शि.क. ३०३/संदीप वाकुडकर यांनी पार पाडली आहे.

पोलीस निरीक्षक
पो.स्टे.वाशिम शहर